सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार,१८ फेब्रुवारी २०२६

आतील पानावर

पान २– रामायणात राघव दिसणार मेघनाथच्या भूमिकेत
पान ३– एक उधाणलेली न्यारी मैफल
पान ४– श्रीलीला झाली आता ऑफिशिअली डॉक्टर
पान ५– मी कधीच लग्न करणार नाही
पान ६– अल्लू अर्जुनला भेटण नाहीये सोपं?





# शाहिद-रश्मिका नव्या सिनेमात झळकणार

शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळे सध्या चर्चेत आहेत. या चित्रपटाचे शूटिंग नुकतेच पूर्ण झाले असून, पहिल्यांदाच ही जोडी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. या नव्या केमिस्ट्रीची चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता असतानाच, आता ही जोडी केवळ एका चित्रपटापुरती मर्यादित नसून दुसऱ्या एका प्रोजेक्टमध्येही एकत्र काम करणार असल्याची माहिती समोर आली आहे. 'कॉकटेल २'च्या चित्रीकरणादरम्यान शाहिद आणि रश्मिका यांच्यातील ट्युनिंग निर्मात्यांना खूप आवडले. वृत्तानुसार, सेटवरील त्यांचा उत्कृष्ट बाँड आणि केमिस्ट्री पाहून एका नवीन प्रोजेक्टसाठी त्यांना विचारणा करण्यात आली आहे. दोघांनीही या कल्पनेला लगेच पसंतीही दर्शवली असून पुन्हा एकदा एकत्र काम करण्यास होकार दिला आहे. या आगामी अनटाइटल्ड चित्रपटाचे नाव अद्याप गुलदस्त्यात असले, तरी हा एक रोमँटिक कॉमेडी चित्रपट असेल असे समजते. सुनील खेत्रपाल या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. 'कॉकटेल २' मधील त्यांची जोडी पाहण्याआधीच दुसऱ्या चित्रपटाच्या बातमीने चाहत्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. दरम्यान, 'कॉकटेल २' हा २०१२ मध्ये आलेल्या सैफ अली खान, दीपिका पदुकोण आणि डायना पेंटी यांच्या 'कॉकटेल' चित्रपटाचा सीक्वल आहे. या नव्या भागात शाहिद आणि रश्मिकासोबत क्रिती सनॉन देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट सप्टेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता असून, प्रेक्षक या फ्रेश जोडीला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी आतुर आहेत.



# प्रिती झिंटाचं दणक्यात कमबॅक



सनी देओलच्या चाहत्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला त्याचा आगामी चित्रपट 'लाहोर १९४७' अखेर प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली असून, हा चित्रपट १३ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. सनी देओल पुन्हा एकदा एका ऐतिहासिक आणि तितक्याच प्रभावी भूमिकेत दिसणार असल्याने प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. या चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे बॉलिवूडमधील तीन दिग्गज नावं एकत्र येत आहेत. आमिर खानने सिनेमाची निर्मिती केली आहे, तर सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांनी दिग्दर्शन केलं आहे. या निमित्ताने सनी देओल आणि राजकुमार संतोषी यांची जोडी 'घायल' आणि 'दामिनी' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटानंतर पुन्हा एकदा एकत्र येत आहे. चित्रपटामध्ये सनी देओलसोबत प्रीती झिंटा मुख्य भूमिकेत असून बर्याच काळानंतर ही जोडी मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहे. तसंच शबाना आझमी, अली फजल आणि अभिमन्यू सिंह यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहे. सनी देओलचा मुलगा करण देओलही झळकणार आहे. प्रिती झिंटा बर्याच वर्षांनी स्क्रीनवर दिसणार असल्याने तिचे चाहते खूप उत्सुक आहेत. चाहत्यांनी कमेंट्सचा पाऊसच पाडला आहे. 'प्रिती इज बॅक','किती वर्षांनी प्रितीला बघणार, खूप आतुर आहोत','प्रिती आणि सनी देओलची जोडी..आता मजा येणार' अशा प्रतिक्रिया चाहत्यांनी दिल्या आहेत. सिनेमाची कथा 'लाहोर १९४७' हा चित्रपट फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित एका हृदयद्रावक कथेवर आधारित आहे. हा चित्रपट सुप्रसिद्ध नाटक 'जिस लाहोर नई देख्या, ओ जम्याई नई' यावर आधारित असल्याचं बोललं जात आहे.

# रामायणात राघव दिसणार मेघनाथच्या भूमिकेत



नितेश तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली साकारला जाणारा 'रामायण' हा चित्रपट सध्या बॉलिवूडमधील सर्वात चर्चेत असलेला प्रोजेक्ट ठरला आहे. या ऐतिहासिक महाकाव्यावर आधारित चित्रपटाच्या स्टारकास्टबाबत दररोज नवनवीन माहिती समोर येत असतानाच आता एका मोठ्या अभिनेत्याची सिनेमात एन्ट्री झाली आहे. या भव्य चित्रपटात आता प्रसिद्ध अभिनेता आणि डान्सर राघव जुयालची एन्ट्री झाली असून तो रावणाचा पराक्रमी पुत्र 'मेघनाथ'ची महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. विशेष म्हणजे या भूमिकेसाठी आधी '१२वी फेल' फेम अभिनेता विक्रांत मेस्सी याच्या नावाची चर्चा होती. मात्र विक्रांतने सोशल मीडियावर पोस्ट लिहून तो कधीच या सिनेमाचा हिस्सा नव्हता असं सांगितलं आहे. त्यामुळेच या भूमिकेसाठी राघव जुयालला निर्मात्यांनी पहिली पसंती दिली आहे. 'किल', 'बॅड्स ऑफ बॉलिवूड' या चित्रपटातील राघवच्या हटके भूमिकांनी प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. त्यामुळे मेघनाथच्या भूमिकेत राघवला पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत, यात शंका नाही. नितेश तिवारी यांचा हा चित्रपट भारतीय सिनेसृष्टीतील आतापर्यंतचा सर्वात महागडा चित्रपट असल्याचे म्हटले जात आहे. यात प्रभू श्रीरामाच्या भूमिकेत रणबीर कपूर, सीता मातेच्या भूमिकेत साई पल्लवी आणि रावणाच्या भूमिकेत दाक्षिणात्य सुपरस्टार यश दिसणार आहे. याशिवाय हनुमान म्हणून सनी देओल आणि लक्ष्मण म्हणून रवी दुबे यांची नावे आधीच निश्चित झाली आहेत. राघव जुयालने साकारलेली मेघनाथची भूमिका चित्रपटाच्या दुसर्या भागात प्रामुख्याने पाहायला मिळणार आहे. हा भव्य चित्रपट दोन भागांत प्रदर्शित होणार असून त्याचा पहिला भाग २०२६ च्या दिवाळीत प्रेक्षकांच्या भेटीला येईल. त्यानंतर २०२७ च्या दिवाळीत या महाकाव्याचा दुसरा भाग प्रदर्शित करण्याचे नियोजन निर्मात्यांचे आहे. या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे याचे संगीत ऑस्कर विजेते ए.आर. रहमान आणि प्रसिद्ध हॉलिवूड कंपोजर हंस झिमर मिळून तयार करत आहेत.

# आमचं नातं तुटायची लोकं वाट पाहतायेत, पण..




बॉलिवूड ते हॉलिवूड असा यशस्वी प्रवास करणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे प्रियांका चोप्रा. 'देसी गर्ल' म्हणून जगभरात नावलौकिक मिळवणार्या प्रियांकाने हॉलिवूडमध्ये तिचा चांगलाच जम बसवला आहे. प्रियांकाने अमेरिकन गायक निक जोनास याच्यासोबत लग्नगाठ बांधली असून सध्या त्यांच्या नात्याविषयी अनेक अफवा पसरत आहेत. याच अफवांवर प्रियांकाने भाष्य केलं आहे. अलिकडेच प्रियांकाने मुलाखतीमध्ये तिच्या आणि निकच्या नात्याविषयी भाष्य केलं आहे. त्यामुळे सगळ्यांचं लक्ष प्रियांकाकडे वेधलं आहे. आमच्या लग्नाला ८ वर्ष झाली आहेत. आणि, लोक आजही आमचं नातं तुटावं याची वाट पाहत असतील तर मग तो त्यांचा विचार झाला. आता मी या सगळ्या गोष्टींकडे लक्ष देणंच बंद केलंय. मुळात मला हेच कळत नाही की आमच्या नात्याचा लोकांना नेमका त्रास काय आहे?, असं प्रियांका म्हणाली. लोकांनी आमच्या वेगळ्या देशावरुन, वेगळ्या धर्मावरुन आणि वयातील अंतरवरुनही ज्या चर्चा केल्या त्याही खूप त्रासदायक होत्या, असंही प्रियांकाने यावेळी सांगितलं. पुढे प्रियांका म्हणाली, बाहेर ज्या चर्चा होतायेत, अफवा पसरतायेत त्याचा आम्हाला काहीही फरक पडत नाही. लोक आमचं नातं तुटायची वाट पाहतायेत. पण, या चर्चा म्हणजे फक्त पाण्यासारख्या आहेत. ज्याप्रमाणे बदकाच्या पंखावरुन पाणी अलगदपणे खाली पडतं. तसंच या चर्चा आमच्यासाठी आहेत. त्यामुळे आम्ही दोघांनी एकमेकांकडे पाहिलं आणि विचार केला की, या सगळ्याचा आपल्याला काहीही फरक पडत नाही. दरम्यान, प्रियांका आणि निकने केवळ ६ महिने एकमेकांना डेट केलं. आणि, त्यानंतर लग्नाचा निर्णय घेतलं. या जोडीला एक गोंडस मुलगीदेखील आहे. या मुलाखतीमध्ये प्रियांकाने निकचं कौतुकही केलं. इंडस्ट्रीमध्ये बऱ्याचदा लोकांना परिस्थितीनुसार बदलावं लागतं. मात्र, कोणतीही परिस्थिती असली तरीदेखील निक कधीच बदलत नाही. आमच्या नात्यावर तो कोणताही परिणाम होऊ देत नाही, असंदेखील ती यावेळी म्हणाली.

# पुन्हा प्रेमात पडणारं रिया चक्रवर्ती?



बॉलिवूड अभिनेत्री रिया चक्रवर्ती गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या निर्माण झालेल्या वादळामुळे आणि कायदेशीर प्रक्रियांमुळे रियाच्या आयुष्यात मोठा काळ अस्थिरतेत गेला होता. जून २०२० नंतर तिला प्रचंड मानसिक तणाव आणि सार्वजनिक टीकेला सामोरं जावं लागलं. मात्र, आता सहा वर्षांच्या दीर्घ काळानंतर रियाने आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. तिने केवळ अभिनय क्षेत्रात पुनरागमनच केले नाही, तर पुन्हा एकदा प्रेम करण्यासाठी तयार असल्याचं म्हटलं. मुलाखतीत रियाने आपल्या संघर्षावर भाष्य केले. ती म्हणाली, जवळपास सात वर्षे मला काम मिळाले नव्हते. मला वाटले होते की माझे अभिनेत्री होण्याचे स्वप्न आता कायमचे भंगले आहे. हे माझ्यासाठी खूप कठीण होते. रिया आता दिग्गज दिग्दर्शक हंसल मेहता यांच्या आगामी वेब सीरिजमध्ये दिसणार आहे. याबद्दल सांगताना ती म्हणाली, जेव्हा हंसल सरांनी मला भूमिकेसाठी विचारले, तेव्हा मी सुरुवातीला नकार दिला होता. मी त्यांना सांगितले की मी अभिनय सोडला आहे. पण त्यांच्या आग्रहामुळे मी सेटवर परतले. सेटवर जाणं हे सायकल चालवण्यासारखं आहे, तुम्ही एकदा शिकलात की कधीच विसरत नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलताना रिया म्हणाली, माझ्या आयुष्यात जे काही घडले, त्यानंतरही प्रेम ही माझ्यासाठी सर्वात सुंदर गोष्ट आहे. मी आजही प्रेमावर विश्वास ठेवते आणि माझ्या आयुष्यात प्रेमाला दुसरी संधी देण्यासाठी मी तयार आहे. माझ्या हृदयाचे दरवाजे प्रेमासाठी खुले आहेत.




# 'भागम भाग २'मध्ये गोविंदाच्या जागी मनोज वाजपेयी

बॉलिवूडमधील विनोदी सिनेमांपैकी एक 'भागम भाग' सिनेमा आजही प्रेक्षकांनाही खळखळून हसवतो. २००६ साली सिनेमा प्रदर्शित झाला होता. प्रियदर्शन यांनी दिग्दर्शित केलेल्या या सिनेमात अक्षय कुमार, गोविंदा आणि परेश रावल ही तिकडी होती. तर लारा दत्ता मुख्य अभिनेत्री होती. आता २० वर्षांनी 'भागम भाग २' येणार असल्याची चर्चा आहे. यामध्ये गोविंदा मात्र दिसणार नाही असा खुलासा परेश रावल यांनी केला आहे. 'भागम भाग २'मध्ये गोविंदाच्या जागी अभिनेते मनोज वाजपेयी भूमिका साकारणार अशी चर्चा होती. आता परेश रावल यांनी यावर शिक्कामोर्तब केलं आहे. एका मुलाखतीत परेश रावल म्हणाले, हे खरंच एकदम भन्नाट कॉम्बिनेशन असेल'. तर गोविंदाबद्दल ते म्हणाले, 'मला याबद्दल खरंच कल्पना नाही. पण आम्हाला गोविंदाची नक्की आठवण येईल'. तसंच सिनेमात आपला डबल रोल असल्याचंही त्यांनी मुलाखतीत कन्फर्म केलं. भागम भाग सिनेमाचा वेगळा चाहतावर्ग आहे. आजही सिनेमा टीव्हीवर लागला की प्रेक्षक आवर्जुन पाहतात. सिनेमाची कथा, त्यातला सस्पेन्स, परेश रावल-अक्षय आणि गोविंदाची कॉमेडी यामुळे सिनेमा ऑल टाईम हिट झाला. आता दुसऱ्या भागात गोविंदा दिसणार नसल्याने चाहत्यांची निराशा झाली आहे. तर मनोज वाजपेयी यांनी अक्षय आणि परेशसोबत कॉमेडी व्यक्तिरेखेत पाहण्यासाठी चाहते आतुर आहेत.

# एक उधाणलेली न्यारी मैफल

**अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या 'रंगवर्धन' उपक्रमांतर्गत पद्माकर देव सभागृहात 'प्रेमयोग' हा काव्यगान- कथनाचा अप्रतिम कार्यक्रम रजनीश जोशी आणि विद्या लिमये यांनी सादर केला. त्या कार्यक्रमाचा हा रंगतदार वृत्तांत...**



'प्रेम कर भिल्लासारखं, बाणावरती खोचलेलं; मातीमध्ये उगवूनसुद्धा मेघांपर्यंत पोचलेलं..' अशा उदात्त प्रेमभावनेच्या विविधांगी कंगोऱ्यांना शब्द-सुरांनी कधी हळुवार तर कधी कणखर स्पर्श करणारी अनोखी मैफल रसिकांनी अनुभवली.

'प्रेमदिना'निमित्त हा मुग्धमधूर 'प्रेमयोग' साधला होता. विविध क्षेत्रातील उपस्थित मान्यवर रसिक; साहित्यिक रजनीश जोशी आणि प्रख्यात गायिका विद्याताई लिमये यांच्या संवादी सादरीकरणावर अक्षरशः झुलत होते. शास्त्रीय संगीताच्या अभ्यासक, गायिका विद्या लिमये यांनी स्वतः प्रतिभासंपन्न कवींच्या रचना स्वरबद्ध केल्या होत्या. त्यांच्या नितळ, सुस्पष्ट, रेशमी सुरांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाला एका वेगळ्या उंचीवर नेले. रजनीश जोशी यांनी 'प्रेम' या सूत्राने संहिताबांधणी केली होती. कवी कुसुमाग्रज, इंदिरा संत, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, सुरेश भट, आरती प्रभू, नारायण कुलकर्णी, हेमकिरण पत्की यांच्या कवितांच्या समावेशाने 'प्रेमयोग' साधला होता. काव्याबरोबरच प्रेमाचे मोहक किस्से, प्रेम कथांचे सार, प्रासंगिक अशा गद्य-पद्य मिश्रणाने मैफल रंगतदार झाली. महाकवी कालिदास, गीतकार गुलजार, गौरी देशपांडे यांचे संदर्भ म्हणजे दुग्धशर्करा योग होता. रजनीश यांची निवेदनशैली खूपच प्रभावी होती. खोडकर, मिश्किल भाव, संयमित अभिनयातून त्यांनी आपले सादरीकरण खुलवले.

'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', या विद्याताई लिमये यांनी गायलेल्या गीताने आरंभ झालेल्या मैफलीत 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं,' ही मंगेश पाडगावकरांचीच रचना सादर करून रजनीश आणि विद्या यांनी बहार उडवून दिली. वसंत बापट यांच्या 'अर्धा विडा द्यावा घ्यावा, त्याची रंगतच न्यारी' या कवितेतील खट्याळ भाव श्रोत्यांना आवडला. मधुकर जोशी यांचे 'झिम झिम झरती श्रावणधारा' या विद्या लिमये यांनी गायलेल्या गीताने सभागृह आर्त विरही सुरात बुडून गेले. पण नंतर 'त्यानं प्रेम केलं किंवा तिनं प्रेम केलं, करू दे की, मला सांगा तुमचं काय गेलं?' या मंगेशी वळणाच्या मिश्किल रचनेनं रसिकांच्या मुखावर स्मितहास्य विलसले.

'जाता जात नाही वेळ, म्हणून जमविला मेळ', 'हिरवे हिरवे माळ मोकळे', 'मनातल्या मनात मी, तुझ्या समीप राहतो' या कवितांना विद्या लिमये यांनी स्वरबद्ध केले होते. शेवटी 'फुलले रे क्षण माझे' या गीताने जणू उपस्थित रसिकांच्या मना-तील भावनाच प्रकट झाल्या. कोणत्याही वाद्याची साथसंगत न घेता आपल्या मंजुळ आवाजाने



विद्याताईंनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

'प्रेमा'सारख्या विषयाची रजनीश यांनी बांधलेली संहिता किती उंचीवर जाऊ शकते आणि त्याचा सहजसुंदर आविष्कार रसिकांना किती हवाहवासा वाटू शकतो हे कार्यक्रम संपल्यानंतर रसिक आपल्या जागी मुग्ध होऊन तटस्थ बसले, त्यावरून प्रत्ययाला आले. या विलक्षण अनुभवाबद्दल या कलावंतांचे आणि तो आयोजिल्याबद्दल संयोजकांचे अभिनंदन !

**शरदकुमार एकबोटे, सोलापूर**



# 'दृश्यम ३' मध्ये 'या' दाक्षिणात्य अभिनेत्याची एन्ट्री!

अजय देवगण स्टारर 'दृश्यम' फ्रँचायझी ही बॉलिवूडमधील सर्वात यशस्वी आणि लोकप्रिय फ्रँचायझीपैकी एक आहे. या चित्रपटाचे दोन भाग आतापर्यंत प्रदर्शित झाले आहेत आणि दोन्ही भाग प्रेक्षकांनी पसंतीस उतरले. पहिल्या दोन भागांच्या यशानंतर लवकरच या फ्रँचायझीचा तिसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे. मागील काही महिन्यांपासून सिनेसृष्टीत या चित्रपटाबद्दल बरीच चर्चा रंगली. दृश्यम ३ मधून अभिनेता अक्षय खन्नाच्या एक्झिटनंतर चाहत्यांना मोठा धक्का बसला होता.त्यानंतर आता चित्रपटात नवीन एन्ट्री झाल्याची माहिती समोर आली आहे. अक्षय खन्नाने दृश्यम ३ चित्रपट सोडल्यानंतर आता त्यामध्ये एका सुपरस्टारची वर्णी लागली आहे. हा अभिनेता थेट अजय देवगणसोबत भिडताना दिसणार आहे. हे अभिनेते दुसरे कोणी नसून प्रकाश राज आहेत. प्रकाश राज यांनी आपल्या सोशल मिडिया अकाउंटवर पोस्ट शेअर करत 'दृश्यम ३'मध्ये त्यांची झाल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. मात्र, या पोस्टमध्ये आपण अक्षय खन्नाला रिप्लेस केलं नाही,असं स्पष्ट देखील केलं आहे. रिपोर्टनुसार, प्रकाश राज यांनी चित्रपटाचं शिंूटग सुरु केलं आहे. त्याचबरोबर दृश्यम-३ मध्ये ते एका वेगळ्याच अंदाजात दिसणार असल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे सिनेरसिकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.दरम्यान, दृश्यम ३ च्या दिग्दर्शनाची धुरा अभिषेक पाठक यांच्या खांद्यावर आहे. हा बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ ला रिलीज करण्यात येणार आहे.

# श्रीलीला झाली आता ऑफिशिअली डॉक्टर

साऊथ अभिनेत्री श्रीलीला तिच्या पुष्पा २ सिनेमातील किस्सीक गाण्यामुळे चांगलीच चर्चेत आली. याआधीही देखील तिने साऊथमध्ये अनेक सिनेमांत काम केले. परंतु किस्सीक गाण्यामुळे बॉलिवूडमध्ये देखील तिचे फॅन फॉलोविंग चांगलेच वाढले. अभिनयासोबत तिच्या चाहत्यांसाठी एक गोड बातमी समोर आली आहे. ती म्हणजे श्रीलीलाने नुकतेच डॉक्टरची डिग्री पूर्ण केली आहे. जवळजवळ सहा वर्षे चित्रपटांमध्ये काम केल्यानंतर आणि वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर, तिने मुंबईतील डीवाय पाटील विद्यापीठातून एमबीबीएस पदवी मिळवली. तिच्या पदवीदान समारंभाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यावेळी, श्रीलीला तिची पदवी स्वीकारण्यासाठी मरून रंगाचा गाऊन परिधान करून स्टेजवर आली. ती रांगेत उभी राहिली, तिच्या कुटुंबाला मिठी मारली आणि पदवी स्वीकारताना आनंदाने हसली. एका व्हिडिओमध्ये ती आणि तिच्या बॅचमेट्स हिप्पोक्रॅटिक शपथ घेताना दिसत आहेत. २०२० च्या बॅचला डॉक्टर घोषित करण्यात आल्याने सर्वांनी आनंद साजरा केला. श्रीलीलाचे चाहते तिच्या शिस्तीने थक्क झाले आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले की, चित्रपटांमध्ये काम करताना तू तुझी वैद्यकीय पदवी कशी पूर्ण केलीस? उत्तीर्ण होण्याचे गुणही मिळणे कठीण आहे. दुसऱ्याने लिहिले की, ती खरोखर हुशार आणि मेहनती आहे. काही चाहते तिला डॉ. श्रीलीला असे संबोधून तिचे कौतुक करत आहेत. श्रीलीला एका तेलुगू कुटुंबातून आली आहे आणि ती बेंगळुरूमध्ये वाढली आहे. तिची आई स्वर्णलता ही बेंगळुरूमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ आहे. तिने चित्रांगदा या तेलुगू चित्रपटात छोटी भूमिका केली होती, परंतु कन्नड चित्रपट किस मध्ये तिला मुख्य भूमिका मिळाली. तिने रवी तेजा, बालकृष्ण आणि महेश बाबू सारख्या मोठ्या स्टार्ससोबत धमाका, भगवंत केसरी, गुंटूर करम, रॉबिन हूड आणि मास जठारा सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. ती पुष्पा २ मधील किसिक या खास गाण्यातही दिसली. ती आता कार्तिक आर्यनसोबत अनुराग बसूच्या रोमँटिक चित्रपटातून हिंदीमध्ये पदार्पण करणार आहे. पवन कल्याण अभिनीत उस्ताद भगत सिंग हा चित्रपट देखील पाइपलाइनमध्ये आहे.





# राम चरणच्या 'पेड्डी'ची रिलीज डेट जाहीर

'आरआरआर' सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटातून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारा सुपरस्टार राम चरण सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्ट्समुळे चर्चेत आहे. 'गेम चेंजर'नंतर राम चरण आता 'पेड्डी' या चित्रपटातून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाला आहे. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर अखेर निर्मात्यांनी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीख जाहीर केली आहे. राम चरणने आपल्या अधिकृत एक्स हँडलवरून 'पेड्डी' चित्रपटाचे एक नवीन आणि अतिशय 'इंटेन्स' पोस्टर शेअर केले आहे. यासोबतच त्याने प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली. राम चरणचा हा ॲक्शन पॅक्ड चित्रपट ३० एप्रिल २०२६ रोजी जगभरातील थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या घोषणेमुळे चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून सोशल मीडियावर चित्रपटाचे पोस्टर तुफान व्हायरल होत आहे. 'पेड्डी' चित्रपटाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे राम चरण आणि बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर यांची जोडी. जान्हवीने यापूर्वी ज्युनियर एनटीआरसोबत 'देवरा' चित्रपटातून दाक्षिणात्य सिनेसृष्टीत पदार्पण केले होते. मात्र राम चरणसोबत ती पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या नव्या जोडीची केमिस्ट्री पाहण्यासाठी चाहते कमालीचे उत्सुक आहेत. 'पेड्डी' हा एक तेलुगू भाषेतील स्पोर्ट्स ॲक्शन ड्रामा चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि लेखन बुची बाबू सना यांनी केले आहे. या चित्रपटात राम चरण एका वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेत दिसणार आहे.

# मी कधीच लग्न करणार नाही

सिनेसृष्ट ललित प्रभाकर मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता आहे. मराठीसह त्यानं हिंदी चित्रपट आणि सीरिजमध्येही काम केलं आहे. ललित प्रभाकर नेहमी त्याची मतं आणि प्रतिक्रिया ठामपणे मांडत असतो. अशातच ललितनं लग्न न करण्याबद्दल सांगितलं आहे. ललित प्रभाकरला मुलाखतींमध्ये अनेकदा तो लग्न कधी करणार किंवा तो कोणाला डेट करत आहे का? लग्नाबद्दल त्याचे काय विचार आहेत, असे असंख्य प्रश्न विचारले जातात. अशातच एका मुलाखतीमध्ये ललितनं लग्नाबद्दलचे त्याचे काय विचार आहेत याबद्दलची माहिती दिली आहे. ललित लग्न करण्याबद्दल नेमकं काय म्हणाला याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात... ललित प्रभाकरला रिलेशनशिपबद्दल तुला काय वाटतं, असं विचारल्यानंतर तो म्हणाला, मी



फार कमी रिलेशनशिपमध्ये होतो. आणि ते सर्व रिलेशनशिप कॉलेजमध्ये असतानाच होतं. बराच काळ मी एकटाच राहत असल्यामुळे मला स्वतःची सोबत खूप आवडते. मला एकटं राहायला फार आवडतं. ललित प्रभाकरला मुलाखतीत पुढे तुला लग्न का करायचं नाहीये, तुझी काय समस्या आहे, असं विचारल्यानंतर तो म्हणाला, लग्न संस्थेपासूनच मला समस्या आहे. मला कोणीतरी तुम्ही आयुष्यभर एखाद्या व्यक्तीबरोबर राहा, असं सांगितलेलं आवडत नाही. ललित याबद्दल पुढे म्हणाला, वर्षानुवर्ष काही गोष्टी चालू आहेत आणि आपण त्या पाळत आहोत. पण अशा बर्याच चुकीच्या प्रथा आहेत, ज्या आपण बंद केल्या. पुढे त्याला म्हणजे तू लग्न करणार नाहीयेस का, असं विचारल्यानंतर तो म्हणाला, हो लग्न तर करणार नाहीये. ललित पुढे म्हणाला, मी मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केलं आहे. त्यामुळे एक चित्रपट सोडला की, दुसर्या चित्रपटात माझं लग्न असतंच. त्यामुळे मी इतक्या सगळ्या विधी इतक्या छान पद्धतीनं केल्या आहेत की, आता मला असं वाटतं की, हे सगळं खऱ्या आयुष्यात तर मी करणार नाही.

# अंकुश चौधरीने सांगितलेले आयुष्यातील डी अक्षराचे महत्व



अनेक गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा साडे माडे तीन या चित्रपटाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. अशोक सराफ, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, भरत जाधव तसेच रिंकु राजगुरू हे कलाकार या चित्रपटात महत्वाच्या दिसणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन अंकुश चौधरीने केले आहे. त्यामुळे अंकुश चौधरी सध्या चर्चेत आहे. याबरोबरच, अंकुश चौधरी नुकताच देवखेळ या वेब सीरिजमध्येदेखील दिसला. या वेब सीरिजमध्ये त्याने इन्स्पेक्टर विश्वास सरंजामे ही भूमिका साकारली आहे. या वेब सीरिजमधून अंकुश चौधरीने ओटीटीवर पदार्पण केले आहे. अशातच अंकुश चौधरीने एका जुन्या मुलाखतीत केलेले वक्तव्य सध्या लक्ष वेधून घेताना दिसत आहे. एका मुलाखतीत अभिनेत्याने डी अक्षराचे त्याच्या आयुष्यात काय महत्व आहे, हे सांगितले होते. अंकुश चौधरी म्हणाला, आज मी तुम्हाला माझ्या आयुष्यातील डीचे महत्व सांगणार आहे. माझ्या करिअरमध्ये लागोपाठ ३ फिल्म अशा झाल्या, त्याची सुरुवात 'डी'ने झाली. दुनियादारी, डबल सीट आणि दगडी चाळ या तिन्ही चित्रपटांची सुरुवात डीने होते. अभिनेता पुढे म्हणालेला, सुरुवात डीने झाली आणि मला अचानक वाटलं की दुनियादारी, डबल सीट या दोन्ही फिल्म चालल्या. लोकांना आवडल्या आणि लोकांनी त्या डोक्यावर घेतल्या.तो प्रेक्षकांना उद्देशून असेही म्हणाला होता की हे सगळे तुमचे आशीर्वाद आहेत. माझ्या एका मित्राने माझ्या असं लक्षात आणून दिलं होतं की ४ नंबर मला खूप फॉलो करतोय. माझा वाढदिवस आहे ३१ जानेवारीला असतो. त्याची एकूण बेरीज चार येते. माझ्या पत्नीचा वाढदिवस ३१ ऑक्टोबरला असतो. त्याची एकूण बेरीज चार आहे. मी ज्या इमारतीत राहतो, तो तेरावा मजला आहे. पुन्हा चार हा अकडा येतो. माझ्या फ्लॅटचा नंबर हा ९०४ आहे. पुन्हा बेरीज ही चार येते. हे जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा डी सुद्धा चौथ्या क्रमांकावर आहे. आता मला माहित नाही की चार नंबर मला फॉलो करतोय की मी त्याला फॉलो करतोय. अभिनेता असंही म्हणालेला की डी म्हणजे ढ आहे असं नाही. डी म्हणजे देव, देवाचा आशीर्वाद आहे, देव बाप्पा आहे. त्याचा आशीर्वाद सदैव तुमच्या आणि माझ्या पाठीशी राहू दे. दरम्यान, देवखेळमधील त्याच्या अभिनयाचे कौतुक होताना दिसत आहे. या वेब सीरिजमध्ये प्राजक्ता माळी, वीणा जामकर हे कलाकारही प्रमुख भूमिकेत दिसत आहेत.

# मी बॉयफ्रेंड बनवणारी नाहियं, डायरेक्ट...



अभिनेत्री रिंकू राजगुरू ही मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. सैराटमुळे रिंकू रातोरात स्टार झाली. या सिनेमात तिने साकारलेली आर्चीची भूमिका प्रेक्षक अजूनही विसरू शकले नाहीत. पण सैराटनंतर रिंकूने मागे वळून पाहिलं नाही. मराठीसोबतच बॉलिवूडमध्येही रिंकूने तिचं नशीब आजमावलं. रिंकूचा चाहता वर्ग प्रचंड मोठा आहे. अनेकदा रिंकूने रिलेशनशिपबद्दल उघडपणे भाष्य केलं आहे. आताही नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत रिंकू रिलेशनशिपबाबत थेट बोलली आहे. नव्या सिनेमाच्या निमित्ताने रिंकूने भाडिपाच्या एका शोमध्ये हजेरी लावली होती. या शोमध्ये रिंकूला तिच्या सिनेमाचे काही किस्से सांगायचे होते. तिच्या समोर तीन जण बसले होते. ज्यांना रिंकूने सांगितलेल्या या गोष्टीतून खोटं काय हे ओळखून दाखवायचं होतं. रिंकूने अतिशय मजेशीर पद्धतीने यात रंगत आणून सिनेमाच्या सेटवर घडलेले काही किस्से सांगितले. यावेळी रिंकूने समोर बसलेल्या मुलांची थोडी फिरकीही घेतली. माझे डोळे खूप खतरनाक आहेत. डोळ्यात बघू नकोस, प्रेमात पडशील. भल्या भल्यांची वाट लागलीय, असं रिंकू तिच्या स्टाइलमध्ये म्हणाली. रिंकूसोबत डेटवर आल्यासारखं वाटतंय असं ते तिघं म्हणत होते. त्यानंतर अगदी मजेशीर पद्धतीने पण थेट रिंकू बोलली की मी बॉयफ्रेंड बनवणारी पोरगी नाही. डायरेक्ट नवरा पाहिजे आपल्याला.... दरम्यान रिंकूचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतो आहे. अलिकडेच रिंकूचा आशा हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. या सिनेमात तिने आशा वर्कर्सची भूमिका साकारली होती. 'झिम्मा २', 'कागर', 'आठवा रंग प्रेमाचा', 'मेकअप' यांसारख्या सिनेमांमध्ये तिने काम केलं आहे. 'झुंड', '२०० हल्ला बोल' या हिंदी सिनेमांमध्येही ती दिसली होती.

'पल पल दिल के पास, तुम रहती हो...' उत्कट प्रीती कधीतरी उफाळून येतेच. १९७३ सालच्या 'ब्लॅक मेल' चित्रपटात एकांतात आठवणीच्या अभिनिवेशात नायकाने पाठविलेल्या पत्राचे वाचन करताना, फ्लॅश बॅकमध्ये व्यक्त केलेल्या किशोर कुमारच्या स्वरातील भावना वाचून नायिका राखीच्या गोड स्मृती चाळवल्या जातात. 'तुम यु ही जलाते रहना आ आ कर ख्वाबों में...' शमा-परवानाच्या खेळात पोळण्यातील मजा फक्त परवानाच जाणतो. तू माझ्या स्वप्नात येऊन असेच प्रेमाचे चटके देत राहा. नायक धर्मेंद्र यांनी आपला प्रेमातील सोशीकतेचा हेतू राजेंद्र कृष्ण यांच्या शब्दातून प्रकट केला.

# वो भूली दास्ताँ: गायक राजेंद्र कृष्ण



अफलातून' 'मेरे सामनेवाले खिडकी में एक चांदसा टुकडा रहता है' १९६८ सालच्या 'पडोसन' चित्रपटातील राजेंद्र कृष्ण यांची ही रचना किशोरकुमार यांच्या सर्वोत्कृष्ट कलाबाजीचा नमुना ठरले. हे गाणे भोला (सुनील दत्त) यांच्या प्रेमाच्या अभिव्यक्तीवर आधारित असून यात विनोदी संकेत व लिप- सिंकिंग आहे. 'मेरी प्यारी बिंदु मेरी भोली बिंदु मेरी माथेरी बिंदु...' वरील चित्रपटातील प्रेमभावनांचा सुंदर आविष्कार असलेले पण गझल प्रकाराच्या जवळ जाणारे हे गीत केवळ काव्य नसून विनोदी कलात्मक रूप आहे. अशा अभिनव काव्य प्रकाराने राजेंद्र कृष्ण बहुआयामी ठरले.

'जरुरत है! जरुरत है!! जरुरत है!!!' 'मनमौजी' सिनेमात खुशालचेंडू किशोर कुमार आपल्या प्रेयसीची खोड कवीच्या विनोदी अंगाच्या शब्दांनी तेवढ्याच नटखट व खिलाडी अंदाजात काढतो. १९६० च्या दशकातील नायक तेवढा धीट नव्हता म्हणून प्रेमाची परिणती विवाहात व्हावी हे गाण्यातून सुचवितो. अवखळपणे थोड्या धीटाईने तिच्यासाठी शिरीमती, कलावती अशी मानवाईक विशेषणे वापरून कवीने गाण्यातील विनोदी ढंग कायम ठेवला. 'तुम्ही मेरे मंदिर तुम्ही मेरी पूजा तुम्ही देवता हो तुम्ही देवता हो' १९६५ सालच्या 'खानदान' चित्रपटातील हे गाणे चित्रपटातील क्रॉऊनिंग ग्लोरी नूतनवर चित्रित झाले.

'मुरझा हुवा है फिर भी ये दिल फूल ही तो है अब आपकी खुशी इसे काटों में तोलीये' परिस्थितीच्या नाईलाजाने तुटलेले हे हृदयही अन्य फुलांसारखेच आहे. तुमच्या खुशीसाठी तुम्ही याला काट्याच्या मापात तोलू शकता. एका मजबूर असहाय स्त्रीचा नाईलाज कवीने हृदयस्पर्शी शब्दात प्रदर्शित केला. 'धीरे से आजा री, अखियन में निंदिया आजा रे आजा' १९५१ सालच्या भगवान दादांच्या 'अलबेला'तील हे अनोखे अंगाई गीत राजेंद्र कृष्ण यांच्या सारस्वत लेखणीची किमया! एक बहीण आपल्या भावाच्या दुःखी मनावर फुंकर घालण्यासाठी गाते. राजेंद्र कृष्ण यांचे शब्द, सी. रामचंद्र यांचे संगीत तर स्वरकोकिळेचा कोवळा स्वर या त्रिगुणाने नटलेले हे गीत अमर झाले.

'गोरे गोरे, वो बांके छोरे कभी मेरे गली आया करो' १९५० च्या 'समाधी' चित्रपटातील राजेंद्र कृष्ण यांची ही चित्रमय रचना, प्रसाद, माधुर्य व गेयता यांनी परिपूर्ण आहे. 'थोडा थोडा मिलना थोडीसी जुदाई सदा चांदणी रात अच्छी नहीं...' सततच्या भेटीगाठीत प्रेमाची आतुरता नष्ट होते तसेच मिलनाचे औत्सुक्यही रहात नाही. हे गाणे प्रसिद्ध होते. 'मेरे पिया गये रंगून किया है वहाँ से टेलिफुन तुम्हारी याद सताती है जिया में आग लगाती है' १९४९ सालच्या बहुश्रुत विनोदगर्भित 'पतंगा' सिनेमातील या गाण्याचे गीतकारही राजेंद्र कृष्णच होते. 'जग गिरेको गिराये कब किसीको उठाये यहाँ गलेसे लगाने वाला कौन है चली चली रे पतंग मेरी चली रे' 'भाभी' चित्रपटातील पतंग या विषयावर राजेंद्र कृष्ण यांची वेगळ्या आशयाची ही रचना आजही रसिकांच्या स्मरणात आहे.'ये मर्द बडे दिल सर्द बडे बेदर्द ना धोका खाना मिठी मिठी बतियों में भूल के ना आना' (मीना-कुमारी) १९५७ च्या 'मिस मेरी' चित्रपटातील अभिनव पद्धतीच्या या जुगलबंदी गाण्यात 'पुरुष श्रेष्ठ की नारी श्रेष्ठ' या विषयावरील कौटुंबिक वाद विनोदी शब्दात मांडला आहे.

'बदली से निकला है चांद परदेसी पिया लौट के तू आजा' आकाशातील ढगांची मळवट दूर होऊन चंद्रमा दिसायला लागला, परंतु प्रियकर आला नाही, ही कल्पना राजेंद्र कृष्ण यांनी शब्दकळेने आपली नाममुद्रा उमटवून १९६० साच्या 'संजोग' चित्रपटात सिद्ध केली. राजेंद्र कृष्ण हे हिंदीतील गीतकारांमध्ये सर्वांत श्रीमंत होते. त्यांना रेस कोर्सचा शौक होता. एकदा त्यांना घोड्यांच्या शर्यतीत ४६,००,००० रुपयांचा जॅकपॉट लागला होता. त्या काळात ही फार मोठी रक्कम होती. राजेंद्र कृष्ण दुग्गल यांचा जन्म ६ जून १९१९ रोजी जलालपूर जट्टन (सध्या पाकिस्तान) इथे झाला. ते सिमला येथे कारकुनी करताना 'दर्द सिमलवी' नावाने शायरीही करायचे. शायरीच्या नादाने मुंबईस आले व १९४७ साली जनता चित्रपटासाठी पहिली पटकथा लिहिली.

गीतकार म्हणून पहिला चित्रपट होता 'जंजीर.' १९४८ साली 'प्यार की जीत' चित्रपटातील रफी साहेबांनी गायलेले... 'एक दिल के टुकडे हजार हुये कोई यहाँ गिरा कोई वहाँ गिरा' या गाण्याने त्यांचे नशीब उजळले. त्याच सुमारास गांधी हत्येनंतर त्यांनी लिहिलेल्या गाण्याने संपूर्ण देश हळहळला. ते गाणे होते... 'सुनो सुनो ऐ दुनियावाले बापूजी की अमर कहानी' १९४९ मध्ये 'बडी बहेन' व 'लाहोर' चित्रपटातील गाण्यांसाठी गीतकार म्हणून शिक्कामोर्तब झाले. नंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. त्यांनी २३२ चित्रपटांसाठी साधारण १५०० च्या वर चित्रपट गीते लिहिलीत. पटकथाही भरपूर लिहिल्या. १९६६ साली 'खानदान' चित्रपटासाठी उत्कृष्ट गीतकार म्हणून फिल्म फेअर पुरस्कार मिळाला. या महान गीतकाराच्या जीवनरूपी पतंगाची डोर २३ सप्टेंबर १९८७ रोजी तुटली. त्यांनी लिहून ठेवलेली अजरामर गीतांची दास्ताँ मात्र सदैव याद राहील... 'ओ भूली दास्ताँ लो फिर याद आ गयी...'

रमेश पोफळी


# 'धडकन गर्ल्स' २५ वर्षानंतर पुन्हा एकत्र


सोशल मीडयावर सिनेमा, त्यातील किस्से वा कलाकारांच्या आयुष्यातील प्रसंग यांची कायमच चर्चा रंगत असते. यात खासकरुन एखाद्या जुन्या सिनेमाच्या कलाकारांचं रियुनियन झालं की त्यांच्याविषयीच्या चर्चांना उधाण येतं. यामध्येच सध्या नेटकऱ्यांमध्ये धडकन गर्ल्सची चर्चा रंगली आहे. २००० साली प्रेक्षकांच्या भेटीला आलेला 'धडकन' हा सिनेमा प्रेक्षकांच्या चांगलाच लक्षात असेल.

शिल्पा शेट्टी, सुनील शेट्टी, अक्षय कुमार आणि महिमा चौधरी यांची मुख्य भूमिका असलेला हा सिनेमा त्याकाळी बराच गाजला होता. इतकंच नाही तर त्यातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. विशेष म्हणजे तब्बल २५ वर्षांनंतर या सिनेमातील अभिनेत्री एकत्र आल्या आहेत. सोशल मीडियावर सध्या शिल्पा शेट्टी आणि महिमा चौधरी यांचा एक फोटो व्हायरल होत आहे. हा फोटो महिमाने तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.

हा फोटो शेअर करत तिने 'धडकन इन २०२६' असं कॅप्शन दिलं आहे. त्यामुळे या दोघींचं रियुनियन चांगलंच चर्चेत आलं आहे. महिमाने शेअर केलेल्या फोटोमध्ये दोन्ही अभिनेत्रींनी क्रीम कलरच्या आऊटफिटमध्ये ट्विनिंग केल्याचं दिसून येत आहे.

यात महिमाने साडी नेसली आहे. तर, शिल्पाने सलवार- कुर्ता घातला आहे. त्यांचा हा फोटो चाहत्यांच्या पसंतीस पडत असून अनेकांनी कमेंट करत 'धडकनच्या सीक्वल कधी येणार?' असा प्रश्नही विचारला आहे. दरम्यान, धडकन या सुपरहिट ठरलेल्या सिनेमामध्ये शिल्पा आणि महिमासोबत अक्षय कुमार, सुनील शेट्टी, शर्मिला टागोर, परमीत सेठी, किरण कुमार, सुष्मा सेठ आणि मनजीत कुल्लर यांसारखे कलाकार झळकले होते.





# बाप रे ! राखी सावंत पुन्हा चढणार बोहल्यावर?

अभिनेत्री, मॉडेल राखी सावंत नेहमीच तिच्या वक्तव्यामुळे आणि पोशाखांमुळे चर्चेत असते. नुकतेच राखीचा एक व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये राखी नवरीच्या पोशाखात दिसत आहे. तसेच राखी आता पुन्हा लग्न करणार आहे. असे देखील तिने या व्हिडिओमध्ये सांगितले आहे. इतक्या वेळा प्रेमात धोका खाल्यानंतर देखील राखी कसे काय परत लग्न करत आहे? असा प्रश्न आता नेटकर्यांना पडला आहे. नुकतेच राखी सावंतचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात राखी सावंत खूपच सुंदर कपडे घातलेली दिसतेय. तिने सोनेरी, भरीव भरतकाम केलेली साडी परिधान केलेली दिसतेय. तिच्या केशरचनाने सर्वात जास्त लक्ष वेधले आहे. तिने गुलाबाच्या रंगांचा वापर करून तिच्या केसांमध्ये हृदयाच्या आकाराची रचना तयार केली आहे. राखी माळ धरून पापाराझींना म्हणत आहे, आज मी एक पूर्णपणे विदेशी वधू आहे. दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये राखी सावंत पॅपराझींबद्दल नाराजी व्यक्त करताना दिसत आहे. ती विचारते, मी मंजुलिकासारखी दिसते का? 'तुझी आई मंजुलिका आहे.' राखीच्या या व्हिडिओवर नेटिझन्सकडून मनोरंजक कमेंट्स आल्या आहेत. युजर्स लिहित आहेत, ती फुलदाणीसारखी दिसते. एका युजरने लिहिले, तिला "X 50' शोमध्ये का घेतले नाही? राखी सावंतच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर, तिचे दोनदा लग्न झाले होते. परंतु, तिचे दोन्ही लग्न फार काळ टिकले नाहीत. आदिल खान दुर्राणीशी तिचे लग्न खूप चर्चेत होते. त्यांच्या नात्यात बिघाड झाला आणि २०२३ मध्ये ते वेगळे झाले. राखीने आदिलवर घरगुती हिंसाचारासह अनेक आरोप केले होते. त्यानंतर आदिलला अटक करण्यात आली. सुमारे पाच महिने तुरुंगात घालवल्यानंतर त्याची सुटका झाली.

# अल्लू अर्जुनला भेटणं नाहीये सोपं?

दाक्षिणात्य कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता म्हणजे अल्लू अर्जुन. आजच्या घडीला या अभिनेत्याचे जगभरात असंख्य चाहते आहेत. म्हणूनच, त्याची एक झलक पाहण्यासाठी प्रत्येकजण धडपड करत असतो. विशेष म्हणजे सोशल मीडियावर अल्लू अर्जुनच्या भेटीविषयी एक किस्सा चर्चिला जात आहे. अभिनेत्याची भेट घेण्यासाठी चक्क ४२ नियमांचं पालन करावं लागतं असता दावा एका महिलेने केला आहे. अलिकडेच कावेरी बरुआ यांनी अल्लू अर्जुनला भेटण्याविषयी भाष्य केलं आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अल्लू अर्जुनला भेटण्यासाठी चक्क ४२ नियमांचं पालन करावं लागतं. एका मुलाखतीमध्ये त्यांनी याविषयी भाष्य केलं असून त्यांना आलेला अनुभवदेखील शेअर केला आहे. मात्र, त्यांची ही मुलाखत पाहिल्यानंतर अल्लू अर्जुनच्या टीमने कावेरी यांचे दावे खोटे असल्याचं म्हटलं आहे. कावेरी बरुआ यांनी अलिकडेच एका पॉडकास्टमध्ये अल्लू अर्जुनविषयी भाष्य केलं. यावेळी त्यांनी अभिनेत्याला भेटण्यापूर्वी त्यांच्याकडे एक नियमावली आल्याचं सांगितलं. या नियमावलीमध्ये चक्क ४२ प्रकारचे नियम होते. सरांशी (अल्लू अर्जुन) बोलतांना त्यांच्या डोळ्यात पाहायचं नाही. त्यांना हस्तांदोलन (शेक हँड) करायचं नाही, असे अनेक नियम या नियमावलीमध्ये होते. इतकंच नाही तर त्यांच्या (अल्लू अर्जुन) मॅनेजरचाही एक मॅनेजर आहे आणि त्याचाही अजून एक मॅनेजर आहे. विशेष म्हणजे तो प्रचंड मग्रूर आहे, असं कावेरी यांनी म्हटलं आहे. अलिकडे अभिनेता अल्लू अर्जुन यांच्या भेटीविषयी ज्या चर्चा होतायेत त्या पूर्णतः चुकीच्या आहेत. अल्लू अर्जुन कायम सन्मानपूर्वक आणि मर्यादेचं भान राखून वागतात. त्यामुळे त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोप गंभीर असून आम्ही नक्कीच त्याची दखल घेऊ. ज्या लोकांनी अभिनेत्याविषयी हे भाष्य केलं आहे त्यांच्याविरोधात आमच्या लीगल टीमने ॲक्शन घेतली आहे. त्यामुळे लवकरच संबंधितांविरोधात मानहानीची कारवाई सुरु होईल. तुम्हा सगळ्यांना एकच विनंती आहे. कोणत्याही विषयाची खात्री न करता ती व्हायरल करणं थांबवा.



# 'सुभेदार'चा टीझर रिलीज




भारतामधील प्रेक्षकांच्या पसंतीचे मनोरंजन प्लॅटफॉर्म असलेल्या प्राइम व्हिडिओने आगामी ॲक्शन-ड्रामा चित्रपट 'सुभेदार'च्या जागतिक प्रीमियरची घोषणा केली. हा चित्रपट ५ मार्च रोजी प्रीमियरसाठी सज्ज आहे. मुख्य म्हणजे ९० च्या दशकात ज्या अनिल कपूर यांना आपण अँग्री यंग मॅन अवतारात पाहिलं. त्याच अवतारात अनिल कपूर या चित्रपटाच्या टीझरमध्ये दिसत आहेत. 'सुभेदार' मध्ये निवृत्त पोलील अधिकारी अर्जुन मौर्य यांच्या आयुष्यातील चढ-उतारांनी भरलेला प्रवास दाखवण्यात आला आहे. अनिल कपूर यांनी या भूमिकेत प्रभावी अभिनय साकारला असून ते गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधात लढताना दिसतात. त्याचबरोबर तुटलेल्या कुटुंबाला पुन्हा एकत्र आणण्याचा त्यांचा प्रयत्न आणि नेहमी योग्य गोष्टीची साथ देण्याचा त्यांचा निर्धार चित्रपटात ठळकपणे मांडला आहे. 'तुम्हारी सुलु', 'जलसा' आणि 'दलदल' सारख्या उत्कृष्ट कथांमुळे ओळखले जाणारे दिग्दर्शक सुरेश त्रिवेणी यांनी 'सुभेदार'चे दिग्दर्शन केले असून विक्रम मल्होत्रा, अनिल कपूर आणि सुरेश त्रिवेणी यांनी संयुक्तपणे या चित्रपटाची निर्मिती केली आहे. ओपनिंग इमेज फिल्म्स निर्मित आणि अनिल कपूर फिल्म अँड कम्युनिकेशन नेटवर्क यांच्या सहकार्याने साकारलेला हा चित्रपट दमदार आणि भावनांनी परिपूर्ण ॲक्शन-ड्रामा आहे. या चित्रपटाची कथा सुरेश त्रिवेणी आणि प्रज्वल चंद्रशेखर यांनी लिहिली आहे. यात अनिल कपूर आणि राधिका मदान मुख्य भूमिकेत झळकणार असून सौरभ शुक्ला, आदित्य रावल, फैजल मलिक आणि मोना सिंह यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. 'सुभेदार'चा प्रीमियर ५ मार्च रोजी प्राईम व्हिडिओवर होणार आहे.



# चुकून मला 'तो' भेटला तर खूप मारेन!

**गो**विंदा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. ९० घ्या काळात त्याने अनेक चित्रपटांत काम करत त्याच्या हटके स्टाइलने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे; पण कित्येक वर्षांपासून तो कोणत्याच चित्रपटातून झळकलेला नाही. तर यादरम्यान तो त्याच्या खासगी आयुष्यामुळे कायम चर्चेत राहिला आहे. गोविंदाची पत्नी सुनीता आहुजा अभिनेत्यावर अनेकदा तो त्यांचा मुलगा यशला इंडस्ट्रीतील कामं मिळावी यासाठी मदत करत नाही, तसेच त्याचे विवाहबाह्य संबंध आहेत, असे काही आरोप करत असतात. अशातच आता त्याच्या नावाचा उल्लेख असलेल्या 'गोविंदा मेरा नाम' या चित्रपटाबद्दल त्याने भाष्य केले आहे. यावेळी त्याने चित्रपटाचा निर्माता करण जोहरबद्दलही नाराजी व्यक्त करत त्याला ताकीद दिली आहे. मुलाखतीत गोविंदा म्हणाला, कोणीतरी माझ्या नावानं चित्रपट बनवला आहे. मला असं वाटतं की, तो करण जोहर आहे. चित्रपटात नवऱ्याच्या प्रेयसीमुळे त्या पती-पत्नीमध्ये भांडणं होतात, असं पाहायला मिळतं. ते एकमेकांवर संशय घ्यायला लागतात. म्हणजे या लोकांनी मुद्दाम जबरदस्तीनं एखाद्याच्या खासगी गोष्टी चित्रपटातून चुकीच्या पद्धतीनं दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. गोविंदा पुढे म्हणाला, जर चुकून मला चित्रपटाचे निर्माते भेटले, तर रजनीकांत जसे चित्रपटात गुंडांची धुलाई करतात तशी मी त्यांची धुलाई करेन. मी वचन देतो की, जर मी त्यांना भेटलो तर मी सार्वजनिक ठिकाणी रजनीकांतसारखी ट्रीटमेंट त्यांना देईन. चुकीचं वागू नका. मी विनंती करतो की, प्रत्येक वेळी विनोद करायचा नसतो. दरम्यान, करण जोहरची निर्मिती असलेल्या 'गोविंदा मेरा नाम' या चित्रपटात विकी कौशल मुख्य भूमिकेत आहे. त्याने गोविंदा वाघमारे हे पात्र यामध्ये साकारलं आहे, जो बॉलीवूडमध्ये बॅकअप डान्सर म्हणून काम करत असतो; पण त्याला नृत्य दिग्दर्शक व्हायचं असतं, असं पाहायला मिळतं. चित्रपटात भूमी पेडणेकरने त्याच्या पत्नीची गौरीची भूमिका साकारली आहे; पण त्याला त्याच्या बायकोला घटस्फोट देऊन त्याच्या गर्लफ्रेंडबरोबर लग्न करायचं होतं. कियारा अडवाणीने ही भूमिका साकारली आहे.



# शाहरुखच्या 'मैं हूँ ना'चा सीक्वल येणार?

**बॉ**लिवूडचा किंग खान अशी ओळख असलेल्या शाहरुख खानचा जगभरात चाहतावर्ग आहे. अभिनेता शाहरुख खानच्या सगळ्याच चित्रपटांना प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं आहे. तसंच आगामी काळातही तो नव्या चित्रपटांमधून आपल्या भेटीला येणार आहे. अशातच शाहरुखच्या एका गाजलेल्या चित्रपटाच्या सीक्वलबद्दल सिनेविश्वात चर्चा रंगली आहे. कोणता आहे तो सिनेमा? जाणून घेऊया... दरम्यान, २०१४ मध्ये आलेल्या 'हॅपी न्यू इयर' चित्रपटानंतर शाहरुख खान आणि फराह खान यांनी एकत्र काम केलेलं नाही. मीडिया लवकरच फराह आणि शाहरुख एका मोठ्या प्रोजेक्टनिमित्ताने १२ वर्षांनी एकत्र येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, 'मैं हूं ना २' ची तयारी सुरू आहे. फराह खान सध्या 'मैं हूं ना, सिनेमाच्या स्क्रिप्टवर काम करते आहे. पिंकव्हिलाच्या रिपोर्टनुसार, फराह खानच्या या चित्रपटात शाहरुख दुहेरी भूमिकेत दिसणार आहे.शाहरुख खानलाही ही कल्पना आवडली आणि तो या चित्रपटाबद्दल उत्सुक आहे. २००४ साली प्रदर्शित झालेला 'मैं हूं ना' हा चित्रपट शाहरुख खानच्या करिअरमधील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक मानला जातो. दिग्दर्शक फराह खानच्या या चित्रपटाची कथा आणि गाण्यांनी चाहत्यांची मने चांगलीच जिंकली. आज २२ वर्षांनंतरही मैं हूं ना या चित्रपटाचे रसिकांच्या मनातील स्थान कायम आहे. या चित्रपटात शाहरुख खान, सुष्मिता सेन, सुनील शेट्टी, जायद खान आणि अमृता राव या कलाकारांच्या महत्वाच्या भूमिका होत्या. तर शाहरुखने सिनेमात साकारलेला मेजर राम आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे.



# इमरान हाश्मीचा अजब डाएट प्लॅन

**अ**ख्खा बॉलीवूड एक तरफ और मेरा इमरान हाश्मी एक तरफ हा डायलॉग गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर तुफान गाजतोय. इमरान हाश्मीच्या रॉमकॉम चित्रपटांची सुद्धा तरुणाईमध्ये कायम चर्चा असते. अलीकडेच इमरान यामी गौतमसह 'हक' चित्रपटात झळकला. त्याने या सिनेमात साकारलेल्या भूमिकेचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. इमरान आता ४६ वर्षांचा आहे तरीही त्याचा फिटनेस आजच्या तरुणाईला लाजवेल असाच आहे. इमरानच्या फिटनेसबद्दल त्याला अनेक मुलाखतींमध्ये प्रश्न विचारले गेले. याबाबत अभिनेत्याने तो गेल्या दोन वर्षांपासून जेवताना एकाच प्रकारचे पदार्थ खातोय याबाबत खुलासा केला आहे. इमरान दिवसातून दोन वेळा जेवतो. पण, यादरम्यान तो वेगवेगळे पदार्थ न खाता सारखंच जेवण जेवतो. त्याच्या जेवणात गेल्या दोन वर्षांपासून कोणत्या पदार्थांचा समावेश आहे जाणून घेऊयात. इमरान हाश्मी सांगतो, मी दिवसातून फक्त दोनवेळा जेवतो आणि महत्वाचं म्हणजे संपूर्ण वर्षभर जेवताना मी एकच पदार्थ खातो. मला माहितीये अनेकांना ही सवय फारच कंटाळवाणी वाटेल. पण, मला आता याची सवय झालीये. मी जेवताना चिकन खिमा खातोकारण, मला ते पचायला सोपं वाटतं. मी पूर्ण असे चिकनचे पीस खाऊ शकत नाही..मला ते जमत नाही. त्यामुळे चिकन खिमा, सॅलड आणि उकडलेली रताळी या पदार्थांचा माझ्या जेवणात समावेश असतो. माझी बायको सुद्धा आता माझ्या या सवयीला, डाएटला कंटाळली आहे. ती नेहमी म्हणत असते, रोज-रोज तेच खाऊन कंटाळा येत नाही का? पण, मला खरंच या रूटिनची आता सवय झालेली आहे. मी गेल्या दोन वर्षांपासून हेच डाएट फॉलो करतोय. दोन वर्षे मी लंच आणि डिनरमध्ये चिकन खिमा, सॅलड आणि उकडलेली रताळी हे पदार्थ खातोय. मी जे सॅलड खातो त्यात, ॲव्होकॅडो, लेट्यूस, ब्रसेल्स स्प्राउट्स, रॉकेट लीफ आणि थोडंसं बाल्समिक विनेगर याचा समावेश असतो. याचबरोबर मी उकडलेलं रताळं सुद्धा खातो. दरम्यान, इमरान हाश्मीचा हा अजब डाएट प्लॅन सर्वत्र चर्चेत आला आहे. यावर अनेकांनी रेसिपी व्हिडीओ सुद्धा बनवले आहेत. अभिनेत्याच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, नुकताच तो 'तस्करी' सीरिजमध्ये झळकला. यानंतर अभिनेता 'आवारपन २'मध्ये प्रमुख भूमिका साकारणार आहे.